**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल**

**अपिल क्रमांक : के.आर- १२९९/२०२३**

**अपिलार्थी, श्री.संजीव पी.मित्तल,**
एस./२९, १ -२ मजला, लाविनो कपूर कंपाऊंड,
एल.बी.एस.मार्ग, गोकुळ नगर, ठाणे (प.), ता.जि.ठाणे ४०० ६०१.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा कार्यलयीन अधिक्षक,
उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका ठाणे,
जोगिला मार्केट, उथळसर रोड, ठाणे (प.), जि.ठाणे.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहायक आयुक्त,
उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका ठाणे,
जोगिला मार्केट, उथळसर रोड, ठाणे (प.), जि.ठाणे.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २५.०८.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १६.११.२०२२ | -- | २५.०१.२०२३ | -- |

अपिलार्थी यांनी दि. ०८.०५.२०२३ रोजीच्या अर्जान्वये *"Plo has not provided any information"*असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २५.०८.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.बाळु हनुमंत पिचड, सहाय्यक आयुक्त तसेच जन माहिती अधिकारी श्रीम.सुनिता सातपुते, कार्यालयीन अधीक्षक, उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*"आपण २ जानेवारी २०१९ ला माझी प्रॉपर्टी सील केल्याबद्दल पुढीलप्रमाणे माहिती द्यावी.*

*१) सदर सिलिंग करण्याच्या ऑर्डर ची प्रत.*
*२) सदर सिलींगच्या ऑर्डर कुठल्या अधिकारी ने दिल्या आहेत त्याचे नाव व कार्यालयीन हुद्दा.*
*३) सदर सिलींग करण्याचा पंचनामा आणि इन्व्हेंटरी चा अहवालाची प्रत व छायाचित्र, फोटो.*
*४) सदर सिलींग करण्याच्या ऑर्डरचे ॲप्रुव्हल व कारणाची प्रत व त्यांच्यावर नोटींग्स.*
*५) सदर सिलींग अगोदर मला पाठवलेला नोटीसेस/पत्रांची प्रत आणि त्याचे जबाब व कागदपत्रे.*
*६) सदर सिलींग करण्यासाठी आलेल्या तक्रारी, केलेल्या कारवाईच्या कागदपत्रांची प्रत.*
*७) तुम्ही सिलींग आधी केलेल्या हेअरिंगच्या अहवालांची प्रत.*
*८) माझ्या तुमच्याकडे दिलेल्या तक्रारी ३ जानेवारी व ५, ७, ९, १८, १९ जानेवारी २०१९ ला असे ७ तक्रारी वर केलेल्या नोटींग्स व एक्शन च्या प्रती.*
*९) तुम्ही असा किती सिलींग २०१५ पासून २०१९ पर्यंत केल्याची इन्फॉर्मेशन व त्यानंतर २०१९ पासून २०२२ पर्यंत केलेल्या सिलींग च्या इन्फॉर्मेशन.*
*१०) तुम्ही सिलींग केल्यानंतर त्यावर नगरसेवकांनी तुम्हाला प्रश्न विचारल्याचा अहवालाची प्रत.*
*११) तुम्ही फेब्रुवारी २०१९ ला सिलींग काढण्याचा पत्र ऑर्डर व कारणाचा प्रत व छायाचित्रे व पंचनामा."*

अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे द्वितीय अपिलावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी असे निवेदन केले की, अपिलार्थी यांना दि.२१.०८.२०२५ रोजीच्या पत्रान्वये माहिती देण्यात आलेली आहे. सदर पत्राची त्यांनी प्रत सादर केली आहे. तथापि अपिलार्थी यांनी ई-मेलद्वारे वेळेची मागणी केली आहे. त्यांची मागणी मान्य करण्यात येत आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०६.१०.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २५ ऑगस्ट, २०२५ .

**सुनावणी दिनांक ०६.१०.२०२५ ( In Continuation of order dt. २५.०८.२०२५)**

**विवेचन**

उपरोक्त दि.२५.०८.२०२५ रोजीच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी ई-मेलद्वारे पुढिल दिनांकाची मागणी केली होती. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १०.०९.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.बाळु पिचड, सहाय्यक आयुक्त तसेच जन माहिती अधिकारी श्रीम.सुनिता मधुकर सातपुते, कार्यालयीन अधीक्षक, उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांना माहिती प्राप्त झालेली नाही. त्यांना दि.०५.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये असे कळविण्यात आले की, आपण इकडील कार्यालयास पुर्व सुचना देऊन कार्यालयीन वेळेत भेट दिल्यास आपणांस हवी असलेली माहिती बाबतची उपलब्ध नस्ती अवलोकनार्थ देण्यात येईल. त्यातील आवश्यक प्रत प्रती रु.२/- महापालिकेत भरणा केल्यास छायांकित प्रती देण्यात येतील.

यासंदर्भात खुलासा करताना जन माहिती अधिकारी श्रीम.सुनिता सातपुते यांनी असे निवेदन केले की, आता आपण संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना रजिस्टर पोस्टाद्वारे त्यांचे पत्त्यावर पाठविली असता, ते त्या पत्तयावर उपस्थित नसल्याने, सदर माहिती परत आली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या या दोन कृती मध्ये विपर्यास दिसू येत आहे. दि.०५.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये त्या अपिलार्थी यांना कार्यालयात बोलावून नस्तीचे अवलोकन करण्यास सांगतात. असे करण्याचे कारण काय हे देखिल त्या स्पष्ट करत नाहीत आणि आता संपूर्ण माहिती त्यांचे पत्त्यावर पाठवतात. म्हणजेच अपिलार्थी यांना नेमकी कोणती माहिती पाठवायची आहे याची पूर्ण कल्पना जन माहिती अधिकारी यांना होती व आहे. असे असताना माहिती प्राप्त करण्यासाठी अपिलार्थी यांना कार्यालयात का बोलावण्यात आले याचा खुलासा जन माहिती अधिकारी यांचेकडून घेणे आवश्यक आहे. तसेच आजच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांना त्यांनी मागणी केलेली माहिती आयोगासमक्ष देण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमक्ष माहिती दिलेली आहे.
२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम.सुनिता मधुकर सातपुते, कार्यलयीन अधीक्षक, उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक १६.११.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन त्यांना प्रत्यक्ष माहिती न देता, दि.०५.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कार्यालयात माहितीचे अवलोकन करण्यासाठी बोलावण्यात आले. त्यामुळे अपिलार्थी यांना माहिती प्राप्त होण्यास विलंब झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.
३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२४.११.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०६ ऑक्टोबर, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम.सुनिता मधुकर सातपुते,
कार्यालयीन अधीक्षक, उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका ठाणे,
जोगिला मार्केट, उथळसर रोड, ठाणे (प.), जि.ठाणे.

**सुनावणी दिनांक २४.११.२०२५ ( In Continuation of order dt.०६.१०.२०२५)**

**विवेचन**

उपरोक्त दि.०६.१०.२०२५ रोजीच्या आदेशान्वये तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये शास्ती का लादण्यात येऊ नये, याबाबतचा खुलासा सादर करणेबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २४.११.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी श्री.सोमनाथ तुकाराम वाघ, उप कार्यलयीन अधीक्षक, उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांना दोन मुद्यांची माहिती देण्यात आली, इतर मुद्यांची माहिती त्यांना देण्यात आलेली नाही. दि.०६.१०.२०२५ रोजीच्या सुनावणीच्या वेळी जी माहिती आयोगासमोर देण्यात आली ती माहिती केवळ सदरचे पत्र नगरविकास विभागाकडे पाठविल्याचे असल्याबाबत होती. त्यामुळे सदर माहिती आपण घेतली नाही. असा खुलासा अपिलार्थी यांनी केला. नगर विकास विभागाशी संबंधित कोणतीच माहिती नसल्याने, सदरचा अर्ज त्या विभागाकडे पाठविण्याचे कोणतेही कारण जन माहिती अधिकारी यांना नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.१२.११.२०२५ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, त्यांनी केवळ दि.०२.०१.२०१९ रोजीच्या सिलींग अहवालाची छायांकित प्रत व दि.१३.०२.२०१९ रोजीच्या सिल उघडून दिलेल्या अहवालाची छायांकित प्रत या दोनच विषयाची माहिती दिलेली आहे. इतर माहिती आपल्याला दिलेली नाही.

त्याचप्रमाणे तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम.सुनिता मधुकर सातपुते, कार्यालयीन अधीक्षक, उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका ठाणे यांचा खुलासा देखिल दि.०६.१०.२०२५ रोजीच्या आदेशान्वये मागविण्यात आला होता. सदर खुलासा त्यांनी सादर केलेला आहे. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले की, आयोगाचे सुनावणीस उपस्थित राहणेबाबत दिनांक २५.०८.२०२५ रोजीचे पत्र या कार्यालयाकडे दिनांक २९.०९.२०२५ रोजी प्राप्त झाले होते. सदर प त्राच्या अनुषंगाने आपण दि.०६.१०.२०२५ रोजीचे सुनावणीस उपस्थित राहून अपिलार्थी यांना पुरविण्यात आलेल्या माहितीच्या छायांकित प्रती व निवेदन सादर केले होते. सदर सुनावणीस अपिलार्थी सुध्दा उपस्थित होते. सदर सुनावणीमध्ये अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती पुरविण्याबाबत आदेश देण्यात आले होते. सदर आदेशाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांना कार्यालयात उपलब्ध असलेली नस्ती कार्यालयीन दिवशी कार्यालयीन वेळेत निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल. निरीक्षणा अंती आपणास आवश्यक असलेल्या माहितीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात येतील असे दिनांक ०८.१०.२०२५ रोजीचे पत्रान्वये नोंदणीकृत टपालाद्वारे अर्जदार यांचे अर्जामध्ये नमूद पत्यावर कळविण्यात आले होते. परंतु पोस्टाद्वारे ADDRESEE ABSENT (INT) असा शेरा लिहुन सदरचे पत्र या कार्यालयाकडे परत दिले आहे. तसेच सदर पत्यावर यापूर्वीही नोंदणीकृत टपालाद्वारे पत्र व्यवहार करण्यात आले आहे. परंतु पोस्टाद्वारे वरील प्रमाणे शेरा लिहुन परत या कार्यालयाकडे पत्र देत आहेत. त्यामुळे अपिलार्थी यांना माहिती पुरविण्यासाठी त्यांचे भ्रमणध्वनीवर व व्हॉट्सअॅप द्वारे पत्र व्यवहार करुन वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु अपिलार्थी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद देण्यात आलेला नाही. अथवा प्रत्यक्ष कार्यालयात उपस्थित राहिलेले नाहीत.

तद्नंतर अपिलार्थी यांना दिनांक१२.११.२०२५ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी मागणी केलेल्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. तसेच अपिलार्थी दि.१८.११.२०२५ रोजी प्रत्यक्ष कार्यालयात उपस्थित असल्याने त्यांना या कार्यालयाकडील उपलब्ध दप्तरी अभिलेख निरीक्षणासाठी देण्यात आले होते. परंतु अपिलार्थी यांनी दप्तरी अभिलेख निरीक्षण करण्यास नकार दिला. अशाप्रकारे या कार्यालयाकडील उपलब्ध दप्तरी अभिलेखात माहितीच्या छायांकित प्रती विनामुल्य देण्यात आलेल्या आहेत. तसेच अपिलार्थी यांना दप्तरी अभिलेख निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. त्यामुळे आपण अपिलार्थी यांना माहिती पुरविण्याबाबत कोणतीही टाळाटाळ केलेली नाही. ही वस्तुस्थिती आहे. असा खुलासा श्रीम.सुनिता सातपुते यांनी केला आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम.सुनिता मधुकर सातपुते, कार्यालयीन अधीक्षक, उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका ठाणे यांच्या खुलाश्याचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, आयोगाने माहिती देणेबाबत दि.०६.१०.२०२५ रोजी केलेल्या आदेशानंतर त्यांनी केलेल्या कार्यवाहीसंबंधी त्यांनी खुलासा सादर केलेला आहे. तथापि आयोगाने त्यांना अपिलार्थी यांच्या दि.१६.११.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन त्यांना प्रत्यक्ष माहिती न देता दि.०५.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये माहितीचे अवलोकन करण्यासाठी बोलावण्यात आले व त्यामुळे माहिती देण्यास विलंब झाला आहे. या कारणास्तव श्रीम.सातपुते यांचा खुलासा मागविला होता. तथापि आपल्या संपूर्ण खुलाश्यामध्ये श्रीम.सातपुते यांनी याबाबींचा उल्लेख केलेला नाही. त्यामुळे त्यांचा खुलासा मान्य करण्यात येत नाही.

अपिलार्थी यांना देखील केवळ दोन मुद्यांची माहिती प्राप्त झाली आहे. त्यांनी मागणी केलेल्या संपूर्ण ११ मुद्यांबाबत काहीच कळविण्यात आले नाही. ज्यावेळी अर्जदार हे मुद्येनिहाय माहिती मागतात त्यावेळी त्यांना मुद्येनिहाय माहिती देणे अपेक्षित असते. एखाद्या मुद्याबाबत माहिती उपलब्ध नसेल, तर त्याबाबतच्या कारणासहित अपिलार्थी यांना तसे कळविणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही जन माहिती अधिकारी यांनी केल्याचे दिसून येत नाही.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना मुद्येनिहाय माहिती विनामुल्य पुरवून, त्याबाबतचा अहवाल आयोगास सादर करणे योग्य होईल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली संपूर्ण मुद्येनिहाय माहिती १५ दिवसात शिघ्र टपालाने नि:शुल्क पुरवावी व त्याबाबतचा अहवाल पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून आयोगासमोर सादर करावा.**
२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम.सुनिता मधुकर सातपुते, कार्यालयीन अधीक्षक, उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका ठाणे यांनी सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून त्यांचा खुलासा अमान्य करण्यात येत आहे. त्यांना निर्णयातील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्याकलम २० (१) अन्वये दिलेली कारणे दाखवा नोटीस कायम करण्यात येत आहे. त्यानुसार त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्याकलम २० (१) अन्वये रु.२५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लादण्यात येत आहे.

सदर रक्कम त्यांचे वेतनातून ०५ मासिक हप्त्यात वसूल करुन लेखाशीर्ष क्र.००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८०० - इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६-१) या अर्थसंकल्पीय लेखाशीर्षा खाली जमा करावी. याबाबतची कार्यवाही करुन पूर्तता अहवाल उप आयुक्त, उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी आयोगास सादर करावा.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०७.०१.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २४ नोव्हेंबर, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

१. उप सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ,
कोंकण भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

२. उप आयुक्त, उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका ठाणे,
जोगिला मार्केट, उथळसर रोड, ठाणे (प.), जि.ठाणे.

३. आहरण व संवितरण अधिकारी, उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका ठाणे,
जोगिला मार्केट, उथळसर रोड, ठाणे (प.), जि.ठाणे.

४. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम.सुनिता मधुकर सातपुते, कार्यालयीन अधीक्षक, उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका ठाणे, जोगिला मार्केट, उथळसर रोड, ठाणे (प.), जि.ठाणे.

**-यांना प्रत**
विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक,
उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका ठाणे,
जोगिला मार्केट, उथळसर रोड, ठाणे (प.), जि.ठाणे. **यांचे मार्फत प्रत रवाना.**

## सुनावणी दिनांक ०७.०१.२०२६ ( In Continuation of order dt. २४.११.२०२५)

## विवेचन

उपरोक्त दि.२४.११.२०२५ रोजीच्या आदेशान्वये विद्यमान जन माहिती अधिकारी यांना माहिती पुरविणेबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ०७.०१.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी ऑनलाईन उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

सदर प्रकरणी प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.बाळू पिचड, सहाय्यक आयुक्त, उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी त्यांचे दि.०६.०१.२०२६ रोजीचे पत्र सादर केले आहे. सदर पत्रान्वये त्यांनी अशी विनंती केली आहे की, त्यांचेकडे सहाय्यक आयुक्त, मुख्य निवडणूक विभ्जागाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ या निवडणूकीच्या संदर्भातील महत्वाची व तातडीची कामे सुरु असल्याने, त्यांना आजच्या सुनावणीस उपस्थित राहणे शक्य होणार नाही. त्यामुळे त्यांनी पुढील सुनावणीसाठीच्या वेळेची मागणी केली आहे.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांची ही विनंती लक्षात घेऊन, प्रकरण पुढील तारखेवर ठेवण्यात येत आहे. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२५.०२.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यता येईल.

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०७ जानेवारी, २०२६.

संगणक-११